# वडधामन्यात जागतिक आदिवासी दिन व ऑगस्ट क्रांती दिवस उत्साहात

■ महासागर प्रतिनिधी,
वाडी, दि. १० :

वडधामना येथील वर्धमान सैनिकी शाळा व कनिष्ठ महाविद्यालय येथे शनिवार ९ ऑगस्ट रोजी जागतिक आदिवासी दिवस तसेच ऑगस्ट क्रांती दिन व रक्षाबंधन निमित्त विविध स्पर्धा व आदिवासी नृत्य, पोस्टर प्रदर्शिनी आणि रक्षाबंधन कार्यक्रम आयोजित करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुखाध्यापिका शारदा व्यास तर प्रमुख पाहूणे म्हणून वरिष्ठ पोलिस निरीक्षक राजेश तटकरे,संस्थाध्यक्ष प्रकाश सावळकर, शेषराव राठोड ,संदीप हिवराळे उपस्थित होते. संचालन शिक्षक तीर्थराज गव्हाळे यांनी तर आभार अजय राठोड यांनी मानले. कार्यक्रमाच्या आयोजनासाठी विद्यालयाच्या सर्व शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थिनींनी सहकार्य केले.



## चाकू बाज गजाआड

नागपूर, दि. १०: चाकूचा धाक दाखवित गंगा जमुना येथे धुमाकूळ घालणाऱ्या आकाश विलास लांजेवार (३०) शास्त्रीनगर यास गुन्हेशाखा युनिट ३ च्या पथकाने अटक केली. ८ ऑगस्ट रोजी रात्री ११.३० च्या सुमारास आकाश हा गंगा जमुना येथे चाकू घेऊन धुमाकूळ घालत होता.

युनिट ३ च्या पथकाला ही माहिती समजीच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली.

पोलिसांना पाहून आकाश दुचाकीसह पळून गेला. पोलिसांनी पाठलाग करून त्याला पकडले. त्याच्या दुचाकीच्या डिक्कीची झडती घेतली असता त्यात चाकू मिळून आला. याप्रकरणी लकडगंज पोलिस ठाण्यात गुन्हा नोंदवून आकाश यास अटक केली.

# सेवानिवृत्त शासकीय कर्मचाऱ्याला ७२ लाखांचा गंडा

## सायबर गुन्हेगाराने दाखवले ७०० पट लाभाचे आमिष

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. १० :

विशेष योजनेत गुंतवणुकीवर ७०० पट लाभाचे आमिष दाखवून सायबर गुन्हेगाराने एका सेवानिवृत्त शासकीय कर्मचाऱ्याला जाळ्यात अडकवले. या आमिषाला बळी पडून पीडित व्यक्तीने ७२ लाख रुपये गुंतविले. मात्र ना त्यांना मुळ रक्कम मिळाली आणि ना लाभ मिळाला. या प्रकरणी सायबर पोलिसांनी पीडित ६० वर्षीय वृद्धाच्या तक्रारीवरून कथित आरोपी इम्तयाजूर रहमानविरुद्ध फसवणूक आणि आयटी ॲक्ट अन्वये गुन्हा नोंदविला आहे.

प्रतापनगर ठाण्यांतर्गत राहणारे पीडित व्यक्ती हे सिंचन विभागात कार्यरत होते. सेवानिवृत्तीनंतर त्यांना बरीच रक्कम मिळाली होती. ९ जूनच्या दुपारी ३.१४ वाजताच्या सुमारास घरी असताना त्यांना आरोपी रहमानचा फोन आला. त्याने त्यांना यूटीआय (युनिट ट्रस्ट ऑफ इंडिया)चा अध्यक्ष आणि संचालक असल्याची बतावणी केली. गुंतवणुकीसाठी त्याच्याकडे विशेष योजना असून त्यात गुंतवणूक केल्यास निश्चित कालावधीनंतर ७०० पट परतावा मिळण्याची माहिती दिली. त्यानंतर आरोपीने त्यांना लिंक पाठवून एका व्हॉट्सॲप ग्रूपशी जोडले. त्या ग्रूपमध्ये आधी पासून असलेले अनेक लोक मोठा लाभ मिळाल्याचे स्क्रीनशॉट पोस्ट करीत होते. यामुळे पीडित वृद्धाला आरोपीवर विश्वास बसला. त्यानंतर आरोपीने त्यांच्याकडून विविध खात्यांमध्ये ७२ लाखांची रक्कम जमा करून घेतली.

कालावधी पूर्ण झाल्यानंतर पीडित वृद्धाने पैसे काढण्याबाबत विचारणा केली असता आरोपीने आणखी ५० लाख जमा करण्यास सांगितले. संशय आल्याने पीडित वृद्धाने सायबर पोलिसात धाव घेतली. पोलिसांनी त्यांच्या तक्रारीवरून विविध कलमान्वये गुन्हा नोंदवत तपास सुरू केला आहे.

# आरटीओ कार्यालयात घातला गोंधळ

## दोघांवर शासकीय कामात अडथळ्याचा गुन्हा

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. १० :

पूर्व नागपुरातील प्रादेशिक परिवहन कार्यालयात दोन जणांनी चांगलाच गोंधळ घातला. महिला मोटर वाहन निरीक्षकाचा पाठलाग करून त्यांना धमकावले आणि बदनामी करीत ड्रायव्हींग टेस्ट थांबविली. या प्रकरणी कळमना पोलिसांनी दोन्ही आरोपींविरुद्ध शासकीय कामात अडथळा निर्माण करण्यासह विविध कलमान्वये गुन्हा नोंदविला आहे.

सोनू शाहू (३०) आणि फिरोज पठाण (४०) अशी आरोपींची नावे आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, फिर्यादी ३७ वर्षीय महिला पूर्व नागपूरच्या प्रादेशिक परिवहन कार्यालयात मोटर वाहन निरीक्षक पदावर कार्यरत आहेत. दोन्ही आरोपी हे सुद्धा तेथे दलालीचे काम करतात. शुक्रवारी दुपारी १ ते २.३० वाजता दरम्यान फिर्यादी महिला कर्तव्यावर हजर होत्या. वाहनधारकांची ड्रायव्हींग टेस्ट घेत असताना आरोपी तेथे आले आणि त्यांचा ड्रायव्हींग घेतानाचा व्हीडिओ बनविण्यास सुरूवात केली.

त्यानंतर अचानक त्यांनी गोंधळ घालत ड्रायव्हींग टेस्ट बंद पाडली. फिर्यादीने त्यांना समजवण्याचा प्रयत्न केला असता आरोपींनी त्यांच्याशी हुज्जत घातली. पैसे घेत असल्याचा आरोप करून बदनाम केले. तसेच आता तुम्ही ड्रायव्हींग टेस्ट कशी घेत हेच बघतो असे म्हणत धमकावले आणि शासकीय कामात अडथळा निर्माण केला. घटनेची तक्रार करण्यासाठी फिर्यादी कळमना ठाण्यात पोहोचल्या असता आरोपीही त्यांच्या मागे-मागे ठाण्यात आले. तेथेही त्यांनी गोंधळ घालत त्यांच्या सहकाऱ्यांना पाहून घेण्याची धमकी दिली. पोलिसांनी दोन्ही आरोपींवर विविध कलमान्वये गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे.

# राष्ट्रीय आदर्श विद्यालयात पर्यावरणपूरक नैसर्गिक राखी स्पर्धा संपन्न

■ महासागर प्रतिनिधी,
रामटेक, दि. १० :

दि.८ ऑगस्ट २०२५ ला राष्ट्रीय आदर्श विद्यालय, रामटेक येथे पर्यावरणपूरक नैसर्गिक राखी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे शाळेचे माजी विद्यार्थी व सेवानिवृत्त सैनिक राजेश कोल्हे, पुष्पकेतन चौरसिया, डॉ.निकुंज शरणांगत आणि संदीप धारणे होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष शाळेचे मुख्याध्यापक रविंद्र चन्ने होते. स्पर्धेत अनेक विद्यार्थ्यांनी स्वतः तयार केलेल्या पर्यावरणपूरक राख्या सादर करत उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. पाहुण्यांनी विद्यार्थ्यांच्या कल्पकतेचे व प्रयत्नांचे कौतुक केले. पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यासाठी पाहुण्यांच्या व विद्यार्थिनी,शिक्षिका यांचे हस्ते वृक्षांना राखी बांधण्यात आली व वृक्षारोपणही करण्यात आले. या उपक्रमातून निसर्गाशी आपले नाते जपणे व संवर्धन करणे ही आपली जबाबदारी आहे. हा संदेश देण्यात आला. कार्यक्रमाचे संचालन वेदप्रकाश मोकद्दम व आभार प्रदर्शन अरविंद कोहळे यांनी केले. सर्व शिक्षकवृंद व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या सहकार्याने कार्यक्रम यशस्वी पार पडला. शेवटी सर्व विद्यार्थ्यांना खाऊचे वाटप करण्यात आले. एकंदरीत, हा दिवस विद्यार्थ्यांना निसर्गाशी नाते जोडणारा आणि पर्यावरण संरक्षणाची प्रेरणा देणारा ठरला.



# हुतात्मा स्मारक येथे क्रांती दिवस संपन्न झाला



■ महासागर प्रतिनिधी,
कामठी, दि. १० :

कामठी येथिल शहीद स्मारक येथील प्रांगणात ९ ऑगस्ट हा क्रांती दिवस म्हणुन साजरा केला .हा क्रांती दिवस स्वातंत्र्या लढ्यातील एक महत्वाचा दिवस आहे .१९४२ ला याच दिवशी महात्मा गांधींनी भारत छोडो आंदोलनाला सुरुवात केली .या लढयात ब्रिटीश राजवटी विरूद्ध निर्णायक लढा दिला गेला .या दिवसाची व शहीद झालेल्या हुतात्म्यां चे आठवण करून श्रद्धांजली दिली जाते . कामठी नगर परिषद मुख्याधिकारी मा .विनोद जाधव आणि मुख्याधिकारी दिपक घोडके यांच्या प्रमुख उपस्थितीत क्रांती दिनाचे कार्यक्रम घेण्यात आले .स्वातंत्र्य लढयात बलीदान दिलेल्या सर्व हुतात्म्यांना आदरांजली वाहण्यात आली .

यावेळेस उपमुख्याधिकारी रत्नमाला फटिंग , प्रशासकीय अधिकारी महेश चौबे , सुशांत जगताप , कन्हान नगर परिषद चे मुख्याधिकारी दीपक घोडके आणि कामठी नगर परिषद मुख्याधिकारी विनोद जाधव यांनी राष्ट्रपिता महात्मा गांधी , डॉ .बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रतिमेला तसेच येथील दिवंगत राष्ट्रपती डॉ .राजेंद्रप्रसाद यांच्या पूर्णाकृती पुतळ्याला माल्यार्पण केले . याप्रसंगी सर्वश्री चेतन तुरस्कर , प्रदीप भोकरे , रुपेश जैस्वाल , धर्मेश जैस्वाल , माधुरी घोडेस्वार , अश्विनी पिल्लारे , जमील अहमद , रंजीत माटे , दिपक जैस्वाल , संतोष मिश्रा , श्री .ढोके , सुभाष भानारकर , दर्शन गोंडाने सहित कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थीत होते .संचालन कौशल्या शर्मा यांनी केले .

# जा.आदिवासी गौरव दिन उत्साहात साजरा



■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. १० :

अखिल भारतीय आदिवासी विकास परिषद विदर्भ विभाग द्वारा ९ ऑगस्ट रोजी जागतिक आदिवासी गौरव दिनानिमित्त अंबाझरी टेकडी नागपूर व फुटाळा तलाव चौक नागपूर येथील भगवान बिरसा मुंडा पुतळा, नागपूर नगरीचे संस्थापक गोंड राजे बक्त बुलंद शहा पुतळा सिव्हिल लाईन नागपूर, क्रांतीवीर नारायणसिंग उईके पुतळा बर्डी, वीरांगना राणी दुर्गावती पुतळा, राणी दुर्गावती नगर येथील पुतळ्याला माल्यार्पण व अभिवादन करण्यात आले.

यावेळी आदिवासी विकास विभाग अपर आयुक्त आयुषी सिंह, नागपूर, दिगांबर चव्हाण,उपायुक्त आदिवासी विकास विभाग नागपूर, सूर्यकांत उईके,अध्यक्ष, अखिल भारतीय आदिवासी विकास परिषद विदर्भ विभाग, दिनेश शेराम, जनरल सेक्रेटरी अखिल भारतीय आदिवासी विकास परिषद विदर्भ विभाग, विजय परतीके, राहुल मडावी, स्वप्नील मसराम, विनय उईके, यशवंत मसराम, राम कोडापे, शाम कोडापे, रवी कोटनाके आदी मान्यवर उपस्थित होते.

# प्रधानमंत्री आवास योजना व रमाई आवास शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद

## ३३६ लाभार्थ्यांची नोंदणी, २२२ अर्ज ऑनलाईन सादर

■ महासागर प्रतिनिधी,
वाडी, दि. १० :

प्रधानमंत्री आवास योजना २.० (शहरी) व रमाई आवास योजनेअंतर्गत वाडी नगरपरिषद हद्दीतील पात्र लाभार्थ्यांसाठी शुक्रवार ८ ऑगस्ट रोजी नगरपरिषद कार्यालयात विशेष मार्गदर्शन व ऑनलाईन नोंदणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. मुख्याधिकारी डॉ. ऋचा धाबर्डे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. मुख्याधिकारी डॉ. ऋचा धाबर्डे व योजना नोडल अधिकारी मयूर झाडे यांच्या उपस्थितीत पार पडलेल्या शिबिरात एकूण ३३६ पात्रता धारकांनी नोंदणी केली, तर २२२ गरजू लाभार्थ्यांचे ऑनलाईन अर्ज भरून घेण्यात आले.



या योजनेत अनुसूचित जाती, जमाती व इतर मागासवर्गीय प्रवर्गातील नागरिकांना लाभ मिळणार असून, अर्जदार व त्यांच्या कुटुंबातील सदस्यांच्या नावे भारतात कुठेही पक्के घर नसावे, वार्षिक उत्पन्न ४.५ लाख रुपये पर्यंत असावे आणि मागील १५-२० वर्षांत योजनेचा लाभ घेतलेला नसावा, अशी पात्रतेची अट आहे. आवश्यक कागदपत्रांमध्ये जागेचे विक्रीपत्र, सातबारा, सनद, जात व उत्पन्न प्रमाणपत्र आवश्यक आहे. शिबिर यशस्वी होण्यासाठी लिपिक कुशल घागरगुंडे, संगणक परिचालक काजल कनोजे, सोनाली चव्हाण, आनंद भगत यांनी सहकार्य केले. न. प. हद्दीतील सर्व पात्र नागरिकांनी या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन मुख्याधिकारी डॉ. ऋचा धाबर्डे यांनी केले.

## सार्वजनिक ठिकाणी गांजा ओढणाऱ्यांना अटक

नागपूर, दि. १०: सार्वजनिक ठिकाणी गांजा ओढणाऱ्या ६ आरोपींना सावनेर पोलिसांनी अटक केली. दिनेश जानबा अडमाची (३५) वार्ड क्र. ७ यशवंत झोपडपट्टी, निशीकांत मधुकर दौडकर (३२) बोरगाव आदासा, सूरज उपासराव चव्हान (२४) बोरगाव आदासा हे सावनेर येथील प्राथमिक आरोग्य केंद्रामागे शवागाराजवळ, घनश्याम गोनन धांडोळे (१९) चिंचपुरा, सावनेर, वेदांत सत्यनारायण सुपे (१९) आणि क्रिश बाबुराव मेश्राम (१८) महालक्ष्मीनगर हे रिलायन्स पेट्रोलपंपजवळील सार्वजनिक जागेवर गांजा ओढताना पोलिसांच्या हाती लागले. अंमली पदार्थ कायद्यान्वये सावनेर पोलिसांनी त्यांच्यावर कारवाई केली.

## बनावट घड्याळी जप्त

नागपूर, दि. १०: नामांकित कंपन्यांच्या बनावट घड्याळी विकणाऱ्या तिलक राज भगवानदास आहुजा (५८) भांडेवाडी यांच्यावर तहसील पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. तिलक राज आहुजा यांचे इतवारी येथील टांगा स्टँड चौकात बाबा वॉच कंपनी नावाचे घड्याळीचे दुकान आहे. आपल्या दुकानातून ते फास्ट ट्रॅक कंपनीच्या बनावट घड्याळी विक्री करतात अशी माहिती कंपनीचे प्रतिनिधी गौरव तिवारी यांना मिळाली होती. तिवारी यांनी दुकानात जाऊन खात्री केली असता आहुजा हे नामांकित कंपन्यांच्या बनावट घड्याळी विकत असल्याचे लक्षात आले. याप्रकरणी तिवारी यांनी तहसील पोलिसात लेखी तक्रार केली. तहसील पोलिसांनी कंपनीच्या प्रतिनिधींसह आहुजा यांच्या दुकानात धाड घातली. या धाडीत फास्ट ट्रॅक या नामांकित कंपनीच्या ७६७ बनावट घड्याळी आणि २१०० नग घड्याळीचे डायल मिळून आले. आहुजा यांच्या दुकानातून पोलिसांनी ५५ हजार ४५० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. त्याचप्रमाणे कामाक्षी सोसायटी, वाठोडा येथील शंकरराम जोगाराम चौधरी यांच्या दुकानातून १७ बनावट घड्याळी जप्त केला. याप्रकरणी तहसील पोलिसांनी ५१, ६३ कॉपीराईट कायद्यान्वये गुन्हा नोंदविला आहे.

## मानकापूर येथे चोरी



नागपूर, दि. १०: संजीवनी सोसायटी, मानकापूर येथे राहणाऱ्या साहील कुलसंगे (२१) यांच्याकडे घरफोडी करून अज्ञात चोरांनी १ लाख १८ हजाराचा ऐवज चोरून नेला. ८ ऑगस्ट रोजी सायंकाळी पाचच्या सुमारास कुलसंगे यांनी आपले घर कुलूपबंद करून ते ड्युटीवर गेले होते. त्याचप्रमाणे परिसरातील लोक हिंगणघाट येथे गेले होते. ही संधी साधून अज्ञात चोरांनी कुलसंगे यांच्या घराचा कुलूपकोंडा तोडून बेडरूममधील कपाटातील सोन्याचे दागिने व रोख ३ हजार रुपये असा १ लाख १८ हजाराचा ऐवज चोरून नेला. याप्रकरणी मानकापूर पोलिसांनी घरफोडीचा गुन्हा दाखल केला आहे.

# उमरेड तालुक्यातील तिखारी, उमरा, दुधा गावात राज्य बस सेवा सुरू

## माजी परसोडी येथील सरपंच अश्विन उके यांच्या प्रयत्नाला यश

■ महासागर प्रतिनिधी,
उमरेड , दि. १० :

उमरेड तालुक्यातील तिखारी, उमरा आणि दुधा गावात स्वातंत्र्यानंतर पहिल्यांदाच राज्य बस सेवा सुरू झाली आहे. चंपा-परसोडी-दाव खापरी मार्गावरील बस सेवेचा अभाव आणि खराब रस्त्यांमुळे स्थानिक लोकांना, विशेषतः महिला आणि शाळकरी मुलींना पायी किंवा ट्रकसारख्या धोकादायक मार्गाने जीव धोक्यात घालून प्रवास करावा लागत होता. वाघांच्या दहशतीमुळे हा प्रवास आणखी धोकादायक बनला होता, ज्यामुळे मुलींच्या शिक्षणावरही परिणाम होत होता. काही दिवसांपूर्वी, बस खापरी-परसोडी-हळदगाव मार्गे जात असताना, चंपा हद्दीत अपघात झाला. या अपघातात ३५ शालेय विद्यार्थी होते. परिसरात अनेक क्रशर प्लांट असल्याने रस्ते खराब आहेत आणि पावसाळ्यात मोठे खड्डे आणि पाणी साचल्याने बस प्रवास धोकादायक बनला होता. या घटनेत सहा विद्यार्थी गंभीर जखमी झाले आहेत, तर काहींना नागपूरच्या सरकारी रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे.



या घटनेनंतर विजय विद्यालयाचे विद्यार्थी आणि ग्रामस्थांनी रस्ता रोखला. निषेध पाहून उमरेड तहसीलदार मनोहर चव्हाण, कुहीचे पोलिस निरीक्षक प्रशांत काळे आणि इतर अधिकारी घटनास्थळी पोहोचले. विद्यार्थ्यांच्या विनंतीवरून अधिकाऱ्यांनी बसने प्रवास केला आणि रस्त्याची पाहणी केली. हळदगाव ग्रामपंचायत येथे ग्रामस्थांसोबत बैठक झाली आणि ग्रामसभा आयोजित करण्यात आली. या ग्रामसभेत जड वाहतूक बंद करण्याचा प्रस्ताव एकमताने मंजूर करण्यात आला. माजी परसोडी गावाचे सरपंच अश्विन उकेयांनी ही समस्या सोडवण्यासाठी पुढाकार घेतला. त्यांनी महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, जिल्हाधिकारी, अतिरिक्त जिल्हाधिकारी प्रवीण महिरे आणि आगर प्रमुख कोकिला कटरे यांची भेट घेतली आणि बस सेवा सुरू करण्यासाठी निवेदन आणि प्रस्ताव सादर केला. चंपा-हळदगाव-परसोडी मार्गे तिखाडी, उमरा, दुधा येथे बस सेवा सुरू करण्याची विनंती केली. माजी सरपंच आतिश पवार यांच्या सततच्या प्रयत्नांमुळे, एसटी बस पहिल्यांदाच तिखडी गावात पोहोचली. उमरेडचे उपविभागीय अधिकारी विद्यासागर चव्हाण, तहसीलदार मनोहर चव्हाण, नायब तहसीलदार राऊत, विभागीय अधिकारी आदेश बागेश्वर, तलाठी रामटेके, नेवारे, नंदरधने, बारामासे आणि ग्रामपंचायत सदस्य या ऐतिहासिक प्रसंगी उपस्थित होते. गावातील महिलांनी अधिकाऱ्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले, तर ग्रामस्थ आणि शालेय विद्यार्थ्यांनी आनंदाने आणि जल्लोषात बसचे स्वागत केले. स्थानिक महिला संगीता गजानन चाचणे, सरिता विनोद नेवारे, ललिता सुरेश नेवारे आणि अंजली नेवारे म्हणाल्या की, खराब रस्त्यांमुळे बस येणे शक्य नव्हते, परंतु आता सेवा सुरू झाल्यामुळे त्यांचे जीवन सोपे होईल. माजी परसोडी सरपंच अश्विन उके तथा माजी सरपंच संघटनाचे अध्यक्ष यांनी पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, जिल्हाधिकारी विपिन इटनकर, उपविभागीय अधिकारी विद्यासागर चव्हाण आणि तहसीलदार मनोहर चव्हाण यांचे आभार मानले. या बससेवेच्या सुरुवातीमुळे ग्रामस्थांना सुविधा मिळाल्या आहेत, ज्यामुळे मुलींच्या शिक्षणाला चालना मिळेल आणि गावाचा विकास होईल.

# डॉ. आंबेडकर जन्मशताब्दी स्मारकासाठी १३ ला निदर्शने



दिनेश अंडरसहारे सभेला मार्गदर्शन करताना

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. १० :

यशवंत स्टेडियम (पटवर्धन मैदान) येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर जन्मशताब्दी स्मारकाचे काम त्वरित करण्यात यावे या मागणीसाठी आरपीआय (सेक्युलर) च्या वतीने १३ ऑगस्ट रोजी दुपारी २ वाजता मनपा कार्यालयासमोर निदर्शने करण्यात येणार आहेत. मागील ३३ वर्षांपासून हा प्रश्न प्रलंबित आहे. या स्मारकाचे काम त्वरित हाती घेण्यासाठी आयपीआय (सेक्युलर) महिला फ्रंटच्या वतीने लष्करीबाग येथील धम्मदीप बुद्ध विहारात जनजागृती सभा घेण्यात आली. याप्रसंगी बोलताना पक्षाचे विदर्भ अध्यक्ष दिनेश अंडरसहारे म्हणाले की, मागील ३३ वर्षांपासून सत्ताधाऱ्यांनी स्मारकाच्या उभारणीसंदर्भात कसे षडयंत्रब रचले यावर प्रकाश टाकला. यावेळी त्यांनी रिपब्लिकन समाजाच्या संघर्षाची माहिती दिली आणि याच मुद्यावर येत्या १३ ऑगस्ट रोजी दुपारी २ वाजता मनपा कार्यालयासमोर नारे निदर्शने करण्यात येणार असल्याची घोषणा केली. सभेला उत्तर नागपूरच्या अध्यक्षा सुशीला कोटांगले, सेक्युलर महिला फ्रंटच्या शहर अध्यक्ष रत्नमाला गणवीर, समता सैनिक दलाच्या सुशीला खांडेकर, जीजाबाई खंडारे, बोरकर आदी उपस्थित होत्या.

## ४२२ पानटपरी चालकांवर कारवाई

नागपूर, दि. १०: तंबाखूजन्य खर्रा विक्री करणाऱ्या नागपूर जिल्ह्यातील ४२२ पानटपरी चालकांवर (कोटपा) कायद्यान्वये कारवाई करण्यात आली.

नागपूर ग्रामीण परिसरात मोठ्या प्रमाणात तंबाखूजन्य खर्ऱ्यांची विक्री करण्यात येते अशी माहिती पोलिसांना मिळाली होती. या अनुषंगाने पोलिस अधीक्षक हर्ष पोद्दार यांनी स्थानिक पोलिसांना खर्रा विकणाऱ्या पानटपरी चालकांवर कारवाई करण्याचे आदेश दिले. या आदेशान्वये बुटीबोरी येथे ३४, बेला २३, एमआयडीसी बुटीबोरी येथे १३, कन्हान ११, खापरखेडा १५, मौदा २३, काटोल ३१, नरखेड २९, कोंढाळी ४, जलालखेडा १२, सावनेर १७, कळमेश्वर २०, केळवद १९, खापा ३७, रामटेक ११, पारशिवनी १०, देवलापार २७, कुही ७, वेलतूर १२ अशा ४२२ पानटपरी चालकांवर कारवाई करण्यात आली.

# प्रवाशाला लुटणाऱ्या दोन लुटारूंना अटक

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. १० :

गणेशपेठ बसस्थानक येथे एका प्रवाशाला मारहाण करून त्याची लुटमार करणाऱ्या दोन लुटारूंना गणेशपेठ पोलिसांनी अटक केली. ८ ऑगस्ट रोजी रात्री ९.४५ च्या सुमारास ही घटना घडली. घटनेच्या वेळी प्रशांत रामदास वाकुले (३०) रा. विटाभट्टी चौक, यशोधरानगर हे गावाला जाण्यासाठी गणेशपेठ बसस्थानक येथे बसची वाट पहात उभे होते. मुख्य प्रवेशद्वारासमोर प्रशांत उभे असताना दोन लुटारू त्यांच्याजवळ आले. लुटारूंनी प्रशांत यांना हातबुक्कीने मारहाण करून त्यांच्या खिशातील मोबाईल, रोख ३८०० रुपये आणि कागदपत्रे असलेली पिशवी घेऊन पोबारा केला. याप्रकरणी गणेशपेठ पोलिसांनी जबरी चोरीचा गुन्हा नोंदवून स्वप्निल राजेंद्र कांबळे (२८) आर्णी (जि. यवतमाळ) आणि राजेश खानसिंग कटरे (४२) जयहिंदनगर, पारडी यांना अटक केली.

# रस्ते वापराच्या सवयी बदलण्यात महाराष्ट्रातील अकोल्यातील तरुणांचा पुढाकार

## रस्ते सुरक्षिततेबाबतचा दृष्टीकोन बदलावा यासाठी २४०० हून अधिक शालेय विद्यार्थी आणि कर्मचाऱ्यांचा सहभाग

**अकोला, १० ऑगस्ट :** होंडा मोटरसायकल अँड स्कूटर इंडिया ने अकोला, महाराष्ट्रात रस्ते सुरक्षा जनजागृतीची लाट आणली. सुफ्फा इंग्लिश हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज आणि के.जी.एन. कॅम्पस येथे आयोजित या रोड सेफ्टी अवेअरनेस कॅम्पेनमध्ये सहभागी झालेले विद्यार्थी आणि कर्मचारी खरे रोड सेफ्टी चॅम्पियन्स बनले.यांनी जागरूक ड्रायव्हिंग, योग्य निर्णय घेणे आणि सामूहिक जबाबदारी या विषयांवर चर्चा पुढे नेली. एचएमएसआय चे प्रशिक्षित रोड सेफ्टी इन्स्ट्रक्टर्स यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या उपक्रमात २४०० हून अधिक जणांनी सहभाग नोंदवला. भारत मोबिलिटी आणि पायाभूत सुविधा क्षेत्रात वेगाने प्रगती करत असताना, वाढत्या वाहतूक घनतेमुळे केवळ तज्ञ चालकच नव्हे तर जबाबदार राइडर्सचीही गरज अधिक वाढली आहे. ही मोहीम तितकीच डायनामिक बनवली गेली होती जितकी ती युवांशी जोडली गेली होती. यात खेळ, क्विझ, दोनचाकी सुरक्षा, ट्राफिक नियम आणि जबाबदार रस्त्याच्या वागणुकीवर सत्रं यांसारख्या संवादात्मक शिकवणीचा समावेश होता. हेल्मेट घालून पाहणं, ब्लाइंड स्पॉट समजून घेणं अशा अनुभवातून सहभागी लोकांना सुरक्षितपणे चालवणं आणि सतर्क राहणं म्हणजे काय हे प्रत्यक्ष जाणवलं. संदेश सोपा आणि स्पष्ट होता: सुरक्षितता ही मनोवृत्तीत बदल करून सुरू होते. रस्त्यावरील नियम आणि दंडांपलीकडे जाऊन



रस्ता सुरक्षित ठेवण्याबद्दल चर्चा झाली. ही एक जीवनशैली आहे असं सांगितलं गेलं जी फक्त स्वतःची नाही तर सभोवताली असलेल्या प्रत्येकाचं रक्षण करू शकते. ही योजना एचएमएसआय च्या मोठ्या प्रयत्नांचा एक भाग आहे, ज्याचा उद्देश लवकरच रस्त्यावरील सुरक्षिततेची सवय रुजवणे आहे. मनोवृत्ती बदलण्यावर भर देऊन, एचएमएसआय अशी आशा करतो की हा बदल एक लहरी प्रमाणे पसरेल जिथे प्रत्येकजण बदलाचा दूत बनेल, आणि आपल्या कुटुंबीयांना, मित्रांना व समुदायाला प्रभावीत करेल. हा उपक्रम फक्त एखाद्या कार्यक्रमापुरता मर्यादित नाही. हा असा संदेश रुजवण्याचा आहे की रस्ता सुरक्षा ही एक वेळची शिकवण नाही, तर आयुष्यभर टिकणारी सवय आहे. आणि ही सवय लवकर लागली, तर उद्याच्या रस्त्यांचा विचार आजच्या रस्त्यांपेक्षा खूप वेगळा असेल. होंडा मोटरसायकल आणि स्कूटर इंडियाची रोड सेफ्टीसाठी सामाजिक जबाबदारीची वचनबद्धता:

२०२१ मध्ये, होंडा यांनी २०५० साली त्यांच्या जागतिक दृष्टीकोनाचा घोष केला, ज्यात ते होंडा मोटारसायकली आणि कार्सशी संबंधित ट्रॅफिक अपघातांमधील मृत्यू शून्यावर आणण्याचा निर्धार करतात. भारतात, एचएमएसआय ही दृष्टी आणि भारत सरकारच्या २०३० पर्यंत अपघातातील मृत्यूंची संख्या अर्धी करण्याच्या उद्दिष्टानुसार काम करत आहे. या उद्दिष्टापर्यंत पोहोचण्यासाठी एक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे २०३० पर्यंत आपल्या मुलांमध्ये रस्ते सुरक्षा बद्दल सकारात्मक मानसिकता विकसित करणे आणि नंतरही त्यांना शिक्षित करत राहणे. शाळा आणि कॉलेजांमध्ये रस्ते सुरक्षा शिक्षणाचा उद्देश फक्त जागरूकता निर्माण करणे नाही, तर तरुण मनांमध्ये एक सुरक्षा संस्कृती रुजवणे आणि त्यांना रस्ते सुरक्षा संदेशवाहक बनवणे हे आहे. हे पुढील पिढ्यांना जबाबदार नागरिक बनण्यास प्रोत्साहित करते आणि सुरक्षित समाजाच्या निर्मितीत महत्त्वाचा वाटा उचलण्यास सक्षम बनवते. एचएमएसआय ही अशी कंपनी बनू इच्छिते जी समाजाला हवी आहे आणि वेगवेगळ्या कल्पनांसह समाजाच्या प्रत्येक स्तरावर रस्ता सुरक्षा जागरूकता आणण्यावर लक्ष केंद्रित करत आहे, शालेय मुलांपासून ते कॉर्पोरेट्स आणि समाजातील सर्वांसाठी विशेष योजना आखत आहे. एचएमएसआय चे अनुभवी सेफ्टी प्रशिक्षक देशभरातील आपल्या १० अंगीकारलेल्या ट्रॅफिक ट्रेनिंग पार्क्स आणि ६ सेफ्टी ड्रायव्हिंग एज्युकेशन सेंटर्स मध्ये दररोज कार्यक्रम राबवतात, ज्यामुळे रोड सेफ्टी शिक्षण समाजाच्या प्रत्येक भागापर्यंत पोहोचेल. या उपक्रमाने आतापर्यंत १ कोटीहून अधिक भारतीयांपर्यंत पोहोच साधली आहे. एचएमएसआय चा नॅशनल रोड सेफ्टी अवेयरनेस प्रोग्राम शिक्षणाला मजेदार आणि वैज्ञानिक बनवतो, ज्यात पुढील गोष्टींचा समावेश आहे: वैज्ञानिक दृष्टिकोनातून तयार केलेले शिक्षण मॉड्यूल: होंडा चे अनुभवी प्रशिक्षक रोड साइन आणि मार्किंग्ज, रस्त्यावर चालकांच्या जबाबदाऱ्या, राइडिंग गिअर आणि पोश्चर समजावून सांगतात, तसेच सुरक्षित राइडिंगचे शिष्टाचार शिकवतात.

# महाराष्ट्र वनहक्क कायद्याच्या अंमलबजावणीत देशात अग्रेसर यूएनडीपी इंडिया अभ्यास

**मुंबई, १० ऑगस्ट :** जागतिक आदिवासी लोक दिनानिमित्त, कांची कोहली आणि श्यामा कुरियाकोस यांनी लिहिलेल्या यूएनडीपी इंडिया च्या नव्या अभ्यासात, वनहक्क कायदा (फॉरेस्ट राईट्स ॲक्ट), २००६ ची अंमलबजावणी आणि मजबूत आदिवासी शासनासाठी मार्ग तयार करण्यामध्ये महाराष्ट्राच्या अग्रेसर भूमिकेवर प्रकाश टाकण्यात आला आहे.

आदिवासी समुदायांचे ताबा हक्क हे शासन परंपरा, वर्तमानातील सामाजिक-वैधानिक संघर्ष आणि भविष्यासाठी सहकार्यपूर्ण उपाय शोधण्यासाठी महत्त्वाचे आहेत. वनहक्कांशी निगडित काम ही सातत्यपूर्ण प्रक्रिया आहे ज्यासाठी संस्थात्मक आणि पद्धतशीर अडथळे मोडून काढणे आवश्यक आहे. यासाठी स्थानिक ते जागतिक धोरणांमध्ये एकात्मता साधणारी कल्पनाशक्ती आवश्यक आहे, असे या अहवालाच्या सहलेखिका कांची कोहली यांनी सांगितले.

सिक्युरिंग राईट्स, एनेबलिंग फ्युचर्स: पॉलिसी लेसन्स फ्रॉम द फॉरेस्ट राईट्स ॲक्ट अँड फ्युचर पाथवेज या अहवालात नमूद करण्यात आले आहे की, जेव्हा आदिवासी समाजाला ठोस वनहक्क प्राप्त होतात आणि सक्षम संस्थात्मक पाठबळ मिळते, तेव्हा ते उपजीविका टिकवणे, पर्यावरणाचे पुनरुज्जीवन करणे आणि स्थानिक लोकशाही अधिक मजबूत करण्याच्या दिशेने पुढाकार घेऊ शकतात.

### महाराष्ट्राचा नेतृत्वाचा नमुना

फॉरेस्ट राईट्स ॲक्ट अंमलबजावणीत महाराष्ट्र हा सुरुवातीपासूनच पुढे असून इतर राज्यांसाठी उदाहरण निर्माण केले आहे:

फॉरेस्ट राईट्स ॲक्ट सेल मॉडेल: स्वतंत्र फॉरेस्ट राईट्स ॲक्ट सेल स्थापन करणारे पहिले राज्यांपैकी एक, ज्यामुळे विविध विभाग आणि स्वयंसेवी संस्थांमध्ये (सीएसओ) समन्वय साधला गेला.

सीएफआर व्यवस्थापन आराखडे: आदिवासी विकास विभाग, यूएनडीपी आणि सीएसओ भागीदारीतून समुदाय वनसंपत्ती व्यवस्थापन आराखड्यांचे (सीएफआर) पायलट प्रकल्प राबवून संपूर्ण राज्यासाठी सीएफआर मार्गदर्शक तत्त्वे तयार केली.

ग्रामसभा-नेतृत्वाखालील व्यवस्थापन: वैयक्तिक वनहक्क (आयएफआर) आणि सामुदायिक वनहक्क (सीएफआर) यांचा एकत्रित वापर करून बांबू आणि लघु वनोपज (एमएफपी) यांचे नियोजनबद्ध संकलन, तसेच मनरेगा निधीतून वन पुनरुज्जीवनाला चालना.

बाजार सामर्थ्यवृद्धी: विदर्भातील लघु वनोपज बाजारपेठांमध्ये सामूहिक सौदेबाजी बळकट करण्यासाठी ग्रामसभा महासंघांची स्थापना.

शाश्वत निधी व क्षमता विकास: एफआरए अंमलबजावणीसाठी स्वतंत्र राज्य बजेट तरतूद आणि एकल ग्रामसभा सबलीकरण कार्यक्रमाद्वारे सातत्याने ग्रामसभा क्षमता विकास.

### आता याचे महत्त्व का

एफआरए लागू होऊन जवळपास दोन दशके उलटून गेल्यानंतरही देशातील अनेक समाजांना त्यांच्या हक्कांचा पूर्ण लाभ मिळायचा आहे. या अभ्यासात महाराष्ट्राच्या शासकीय नवकल्पनांचा उल्लेख करण्यात आला असून, लिंगसमानता, दारिद्र्य निर्मूलन, संवर्धन आणि विकेंद्रित शासन यांच्याशी वनहक्क जोडण्यासाठी हा एक आदर्श आराखडा ठरू शकतो, असे नमूद केले आहे.

# वी बिझनेस भारताच्या ऊर्जा क्षेत्राला चालना देण्यास कटिबद्ध; पुढील तीन वर्षांत १.२ कोटी स्मार्ट मीटर्स कनेक्ट करण्याची तयारी सुरू

**मुंबई, १० ऑगस्ट :** आघाडीचे दूरसंचार आणि आयओटी सोल्यूशन्स पुरवठादार (व्होडाफोन आयडिया लिमिटेड)ची उद्योग शाखा असलेला वी बिझनेस भारताच्या ऊर्जा क्षेत्रात मोठे परिवर्तन घडवून आणण्याच्या तयारीत आहे. आज एंटरप्राइझ विभागाने म्हणजेच या उद्योग शाखेने पुढील तीन वर्षांत संपूर्ण भारतभरात १.२ कोटी स्मार्ट मीटर्स सक्षम करण्याच्या योजना जाहीर केल्या आहेत. यामुळे वीबिझनेस भारतातील स्मार्ट युटिलिटी परिवर्तनाच्या अग्रभागी पोहोचले असून त्यायोगे एक मजबूत, अनुकूल आणि पर्यावरणपूरक ऊर्जा पायाभूत सुविधा विकसित करण्यास चालना मिळणार आहे.

इंडिया स्मार्ट ग्रिड मिशनशी सुसंगती राखत हा व्यापक उपक्रम ॲडव्हान्स्ड मीटरिंग इन्फ्रास्ट्रक्चर (एएमआय) आणि आयओटी सोल्यूशन्समध्ये नाविन्यपूर्णतेला चालना देईल. ॲडव्हान्स्ड तसेच प्रीपेड वीज मीटर्सचा वापर निश्चित करत त्याद्वारे एक डिजिटलदृष्ट्या सक्षम ऊर्जा परिसंस्था तयार करण्याचे ध्येय आहे. यामुळे वितरण कंपन्यांना (डिस्कॉम्स) ॲग्रीगेट टेक्निकल अँड कमर्शियल (एटी अँड सी) तोट्यात घट करता येईल आणि ग्राहकांना त्यांच्या ऊर्जा वापराबाबत त्वरित माहिती मिळेल.

या उपक्रमाच्या केंद्रस्थानी वी बिझनेस आयओटी स्मार्ट सेंट्रल प्लॅटफॉर्म असून तो लाखो कनेक्ट केलेल्या मीटर्सवर सर्वसमावेशक व्हीजीबीलिटी म्हणजेच दृश्यमानता आणि नियंत्रण पुरवितो. भारतातील स्मार्ट मीटर्स व्यवस्थापित करण्याचा पाच वर्षांहून अधिक अनुभव घेतलेला वी बिझनेस एएमआय क्षेत्रातील आपली कौशल्ये सिध्द करत आहे आणि ऊर्जा क्षेत्रातील बदलत्या गरजांसाठी विस्तारीत आणि लवचिक उपाययोजना तयार करत आहे. वेगवेगळ्या भौगोलिक ठिकाणीही सहज एकत्रीकरण आणि जलद विस्तार सुनिश्चित करत वी बिझनेसने स्मार्ट मीटर्सच्या पूर्व व पश्चात ऑनबोर्डिंगसाठी सुसूत्र कार्यपद्धती विकसित केल्या आहेत. टेल्को-ग्रेड प्रोटोकॉल्स वापरून, वी बिझनेस युटिलिटीज आणि ग्राहकांसाठी डेटा संरक्षणाची हमी देत आहे. जोडीला एएमआय रोलआउट्स अधिक जलद आणि विश्वासार्ह असावित यासाठी कंपनीकडे एक अत्याधुनिक आयओटी प्रयोगशाळा असून तिथे पूर्वजोडणी तपासणी आणि प्रमाणीकरण केले जाते.

या विकासावर भाष्य करताना वीचे चीफ एंटरप्राइझ बिझनेस ऑफिसर अरविंद नेवातिया म्हणाले, आम्ही स्मार्ट मीटर ऊर्जा परिसंस्थेतील अग्रणी आहोत. २०१८ मध्ये आम्ही पहिल्यांदा स्मार्ट मीटर्सची जोडणी केली आणि आयओटी लॅब सारख्या नावीन्यपूर्ण गोष्टी सुरू केल्या. आमची



हीच बांधिलकी आम्ही पुढे चालू ठेवत आहोत आणि संपूर्ण भारतभर १.२ कोटी स्मार्ट मीटर्सची जोडणी करण्याचा आमचा उद्देश आहे. त्यामुळे ऊर्जा हानी कमी होईल, कार्यक्षमता वाढेल आणि ग्राहकांचा अनुभव अधिक उंचावेल.

# सोनी सबवरील पुष्पा इम्पॉसिबल मालिकेत प्रोफेसर शास्त्रींवर करण्यात आलेल्या खोट्या आरोपांविरुद्ध पुष्पाचा लढा

**मुंबई, १० ऑगस्ट :** प्रेरणादायक कथानक आणि भावनांनी समृद्ध व्यक्तिरेखांमुळे सोनी सबवरील पुष्पा इम्पॉसिबल मालिकेने प्रेक्षकांच्या मनात घर केले आहे. सध्याच्या कथानकात पुष्पा (करुणा पांडे) वकील बनण्याचे आपले स्वप्न पूर्ण करण्यासाठी प्रयत्नशील आहे, पण तिच्या मार्गात सतत काही ना काही अडथळे येत आहेत, ज्यामुळे तिच्या धैर्याची, दृढतेची आणि तिच्या नात्यांचीही परीक्षा होत आहे. अलीकडच्या भागांमध्ये, प्रेक्षकांनी पाहिले की प्रोफेसर शास्त्रींना (गौरव चोप्रा) तुरुंगात पाठवण्यासाठी कादंबरी (वृंदा त्रिवेदी)ने कट रचला आहे.

आगामी भागांमध्ये, पुष्पा प्रोफेसर शास्त्रींवर लावण्यात आलेल्या विनयभंगाच्या आरोपांविरुद्ध ठाम भूमिका घेताना दिसेल. स्वतः प्रोफेसर शास्त्रींना त्यांच्या बिघडलेल्या अवस्थेमुळे त्या विशिष्ट घटनेची स्मृती नसल्याने आपले निर्दोषत्व ते सिद्ध करू शकत नाहीत. परंतु, पुष्पा हार मानत नाही. सत्य शोधण्याचा संकल्प घेऊन ती पुरावे शोधण्याच्या प्रयत्नात त्या मुलीला भेटते, जिने प्रो. शास्त्रींवर आपला विनयभंग केल्याचा आरोप केला आहे. पण तिला जे समजते ते धक्कादायक आहे, कारण ते प्रो. शास्त्रींच्या विरोधात जाणारे आहे.

प्रो. शास्त्री पुरते अडकले आहेत आणि वेळ निघून चालली आहे. पुष्पा त्यांचे निरपराधित्व कसे सिद्ध करू शकेल? मालिकेतील नाट्य तीव्र होत चालले आहे आणि पुष्पासमोर खूप मोठे आव्हान आहे.

पुष्पा इम्पॉसिबल मालिकेत पुष्पाची भूमिका करणारी करुणा पांडे म्हणते, हे कथानक खूप दमदार आहे, कारण त्यात काही संवेदनशील विषय हाताळले आहेत. त्यात खोटी आरोपबाजी आहे तसेच सत्याच्या बाजूने ठाम उभे राहण्याचा कणखरपणाही आहे. जेव्हा खुद्द प्रोफेसर शास्त्री हार मानतात तेव्हा पुष्पा जी हतबलता अनुभवते, ती मी समजू शकते. पण, आपल्या स्वभावाला अनुसरून, ती सहजासहजी हार मानत नाही. अशा उत्कट प्रसंगांमध्ये पुष्पा साकारताना माझ्यातील अभिनेत्रीची कसोटी होते. मला जो संघर्ष आणि ताकद जाणवतो आहे, तोच प्रेक्षकांनाही जाणवेल, अशी आशा आहे.

# झी टीव्हीचे कलाकार सांगत आहेत रक्षाबंधनाबद्दलचे त्यांचे विचार

**मुंबई, १० ऑगस्ट :** रक्षाबंधन हा दिवस भावंडांमधील पवित्र नाते साजरे करतो, त्यांना आयुष्यभर जपलेल्या प्रेमाची, विश्वासाची आणि साथ देण्याच्या वचनाची आठवण करून देतो. आजच्या धावपळीच्या युगात, जिथे दैनंदिन जबाबदाऱ्या आणि अंतरामुळे आप्तजन अनेकदा दूर राहतात, तिथे रक्षाबंधन ही केवळ एक पारंपरिक सण नसून एक असा सोहळा आहे जो प्रत्येक भावंडाला एकमेकांशी पुन्हा जोडतो, जुन्या आठवणींना उजाळा देतो आणि एकमेकांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याची संधी देतो. हे एक सौम्य स्मरण आहे थोडा वेळ थांबण्याचे, राखी बांधण्याचे, आणि भावंडांमधील अद्वितीय नाते साजरे करण्यासाठी मग शारीरिक अंतर किंवा वेळेची कमतरता असो. या खास दिवशी झी टीव्हीचे कलाकार वसुधा मधील परिणीता बोरठाकूर, जमाई नं.१ मधील अभिषेक मलिक, जाने अनजाने हम मिले मधील भरत अहलावत, तुम से तुम तक मधील वंदना पाठक आणि जागृति एक नयी सुबह मधील आर्य बब्बर आपल्या भावंडांसोबत असलेल्या हृदयस्पर्शी नात्याबद्दल सांगत आहेत.

झी टीव्हीच्या वसुधा मालिकेत चंद्रिकाची भूमिका साकारणारी परिणीता बोरठाकूर म्हणाली, माझा चुलत भाऊ हा नेहमीच माझी सगळ्यात मोठी सपोर्ट सिस्टम आणि खंबीर साथीदार राहिला आहे. आमचे नाते हसण्याखिदळण्याने, खोडकर भांडणांनी आणि अनेक जुन्या आठवणींनी भरलेले आहे, जे वर्षागणिक अधिकच खास होत गेले आहे. एक आठवण जी नेहमीच माझ्या चेहऱ्यावर हसू आणते ती म्हणजे जेव्हा आम्ही लहान होतो आणि घरच्यांसोबत लांबच्या प्रवासासाठी ट्रेनने जायचो. मी कंटाळायचे, अस्वस्थ व्हायचे, पण तो नेहमी काहीतरी मजेदार करून मला गुंतवून ठेवायचा कधी वेड्या गोष्टींच्या गोष्टी सांगून, कधी आपल्या बॅगमधून लपवून आणलेला खाऊ मला द्यायचा, तर कधी काहीतरी नवा गेम तयार करून. आम्ही दोघे खिडकीजवळ बसून तासन् तास गप्पा मारायचो, बाहेरचे जग नजरेसमोरून जाताना पाहायचो. त्याच्यासोबतचे सगळे क्षण नेहमीच प्रेम आणि उबदारपणाने भरलेले असतात. या रक्षाबंधनाला मी त्याला प्रत्यक्ष भेटण्याची, एकत्र गोडधोड खाण्याची, हसतखेळत रक्षाबंधनचा सण साजरा करण्याची आणि आमच्या नात्याइतकीच खास आणि अर्थपूर्ण राखी याच्या मनगटावर बांधण्याची खूप उत्सुकतेने वाट पाहतेय.

झी टीव्हीच्या जमाई नं.१ मध्ये नीलची भूमिका साकारणारा अभिषेक मलिक म्हणाला, माझी बहीण ही नेहमीच माझी सर्वात मोठी प्रेरणा आणि मार्गदर्शक राहिली आहे. मी तिचे केवळ कौतुक करत नाही, तर तीच खरी ती व्यक्ती आहे जिने मला आज मी जो काही आहे तो घडवायला मदत केली. ती माझ्यासाठी दुसरी आईच आहे. खरं तर, आजही काही घडले की सर्वप्रथम मी तिलाच फोन करतो. लहानपणापासून आमच्यात एक अबोल नाते आहे, जे आमच्या आईवडिलांनाही नेहमी जाणवायचं आणि त्यांना आवडायचं. आम्ही दोघेही एकाच गोष्टींमध्ये रमायचो, आमची एकसारखी जिज्ञासा असायची, आणि एकमेकांच्या सहवासातच दिलासा मिळायचा. आम्ही कितीही दूर असलो, तरी प्रत्येक रक्षाबंधनाला आम्ही आवर्जून भेटतो, एकत्र वेळ घालवतो आणि हा दिवस आमच्या खास परंपरेप्रमाणे साजरा करतो. आम्हा दोघांनाही खाण्याची खूप आवड आहे, म्हणून आम्ही नवीन रेस्टॉरंट्स शोधतो, आणि दिवसाचा शेवट हसत-खेळत, आठवणी, गोष्टी आणि भावंडांच्या प्रेमाने भरलेल्या जेवणाने करतो. हाच सणाचा आनंद मला दरवर्षी अनुभवायचा असतो.

झी टीव्हीच्या जाने अनजाने हम मिले मध्ये राघवची भूमिका साकारणारा भरत अहलावत म्हणाला, माझी बहीण माझ्यासाठी किती महत्त्वाची आहे, हे शब्दांत सांगणे खरंच कठीण आहे. ती नेहमीच माझी ताकद राहिली आहे प्रत्येक प्रसंगात माझ्या पाठीशी उभी राहणारी, मी मार्ग चुकलो की मला योग्य दिशा दाखवणारी, आणि माझ्या प्रत्येक यशात माझा उत्साह वाढवणारी. आम्ही नेहमी एका टीमसारखेच राहिलो आहोत आनंद असो वा अडचण, सगळे एकत्र वाटून घेतले आहे. मला खूप भाग्यवान वाटतं की माझ्याकडे केवळ एक नाही, तर दोन बहिणी आहेत एक रिअल आणि एक रीलमधील ज्या माझ्या आयुष्यात इतके प्रेम घेऊन येतात. मला आजही आठवतं, एक वेळ होती जेव्हा तिला नवीन स्कूल बॅग हवी होती, आणि फक्त तिच्यासाठी ती बॅग घेण्यासाठी मी गुपचूप पैसे वाचवले होते. तिला तिची हवी असलेली गोष्ट देणे, तिच्या छोट्या इच्छांची पूर्ती करणे, ही माझ्यासाठी मोठी अभिमानाची गोष्ट होती. या रक्षाबंधनाला मी पुन्हा तेच करायचे ठरवले आहे, तिला तितकेच खास आणि जपलेले वाटावे, जसे तिने नेहमी मला वाटू दिले आहे.

झी टीव्हीच्या तुम से तुम तक मध्ये गायत्री देवीची भूमिका साकारणाऱ्या वंदना पाठक म्हणाल्या, माझा भाऊ आणि मी एकमेकांशी खेळत-भांडत कसे क्षणात सगळे विसरून एकमेकांचे सर्वात मोठे पाठीराखे होतो, यात एक खास जादू आहे. माझ्या आयुष्यातल्या काही सर्वात सुंदर आठवणी त्याच्यासोबत घडलेल्या आहेत. विशेषतः आजी-आजोबांच्या घरी सुट्टीतले छान दिवस आठवतात. आम्ही लूडो, अंताक्षरी आणि रंगकामात दुपारभर हरवून जात असू. आता तो अमेरिकेत स्थायिक झालाय, आणि त्याची खूप आठवण येते. त्या क्षणांना, त्या आठवणींना मी घट्ट पकडून ठेवले आहे. आताही आठवतंय ते झाडावर आधी कोण चढणार यावरून झालेलं भांडण, अर्धा तास भाड्याने घेतलेली सायकल आणि तिच्यावर आधी कोण बसणार यावरून झालेलं वाद, आणि दररोज घोडागाडीने शाळेत जाण्याचा अनुभव हे सगळे क्षण आजही मनात ताजे आहेत. आज आमच्यात अंतर आहे, तरी आमचे नाते अजूनही तितकेच घट्ट आहे. या रक्षाबंधनालाही, दरवर्षीप्रमाणे त्याच्या सुख-समृद्धीची प्रार्थना करत, आणि लवकरच पुन्हा भेटून नव्या आठवणी निर्माण होवोत अशी आशा करत त्याला प्रेमाने राखी पाठवणार आहे.

# सोनी सबवरील उफ्फ ये लव है मुश्किल ... मालिकेत युगचे हृदयपरिवर्तन होऊन तो कैरीशी विवाहबद्ध होणार का?



**मुंबई, १० ऑगस्ट :** सोनी सबवरील उफ्फ ये लव है मुश्किल ... मालिका त्यातील नाट्य, भावनिक संघर्ष आणि अनपेक्षित कलाटण्यांमुळे प्रेक्षकांची उत्कंठा वाढवते आहे. या मालिकेच्या केंद्रस्थानी युग सिन्हा (शब्बीर अहलूवालिया) आणि कैरी (आशी सिंह) यांच्यातील बदलत्या नात्याची कहाणी आहे. युग एक प्रामाणिक पण तुटक स्वभावाचा वकील आहे, तर कैरी एक उत्साही तरुणी आहे, जी आपल्या भावंडांसाठी संघर्ष करत आहे. प्रेम आणि विश्वास या भावनांबद्दल तिच्या मनात सतत विचार सुरू आहेत. अलीकडच्या भागांमध्ये युगने कैरीच्या भावंडांना हे सांगून टाकले आहे की, कैरी त्यांची सख्खी बहीण नाही. त्यामुळे कैरी हताश झाली आहे आणि आपल्या भावंडांना पुन्हा आपल्या सोबत आणण्यासाठी धडपड करत आहे. युगने तिला सांगितले आहे की, त्यांना परत आणण्यासाठी ती एक सुरक्षित आणि स्थिर जीवन जगत असल्याचे तिला सिद्ध करून द्यावे लागेल, व त्यासाठी कदाचित लग्न करावे लागेल. ह्याचा फायदा घेऊन विक्रम (रजत दहिया) तोतया मजनूच्या रूपातल्या जय (तुषार धेंबला) ला कैरीसमोर आणतो आणि युग आणि कैरीचा बदला घेण्याची संधी साधतो. युग हाच खरा मजनू आहे याबद्दल अनभिज्ञ असलेली कैरी मजनूशी विवाहबद्ध होण्यास सज्ज होते. प्रेक्षकांना या भागांमध्ये नाट्यमय कलाटण्या बघायला मिळतील. कैरी लग्नास तयार होते कारण त्यामुळे आपली भावंडे आपल्याला परत मिळतील, असा तिचा समज असतो, पण या निमित्ताने काही गुपितं बाहेर येतील आणि बरीच उलथापालथ होईल. मंडपातच युग जयची खरी ओळख कैरीसमोर उघड करेल आणि तिला चुकीच्या माणसाशी लग्न करण्यापासून रोखेल. या सगळ्या घडामोडींमध्ये युगचे हृदयपरिवर्तन झाल्याचे स्पष्ट दिसू लागेल. हा तोच युग आहे, ज्याच्या मनात समस्त स्त्री जातीविषयी अत्यंत कटुता होती, ज्याने आपल्या हृदयाचे दरवाजे बंद करून घेतले होते आणि पुन्हा प्रेमात न पडण्याचा संकल्प केला होता. आता मात्र तो कैरीसाठी झगडत आहे, तिला सत्याची जाण करून देत आहे आणि तिला गरज असताना तिच्या पाठीशी उभा आहे. युगचे खरोखर हृदयपरिवर्तन झाले आहे का? कैरीविषयीच्या आपल्या भावना तो स्वतःशी कबूल करू शकेल का?

# राशीभविष्य

**मेष :** आजचा दिवस संमिश्र राहील. कामावर लक्ष केंद्रित करा. विद्यार्थ्यांचे मित्रांसोबत संबंध वाढू शकतात. नवीन जबाबदाजया यशस्वीपणे पार पाडाल. तुमच्याबद्दल लोक मत्सर करू शकतात.

**वृषभ :** आजचा दिवस खूप चांगला जाईल. पैशांसंबंधी चांगली बातमी मिळेल. सर्व कामे पूर्ण होतील. एखाद्या खास व्यक्तीची भेट होऊ शकते. सहकाजयांची मदत मिळेल. जीवनसाथीसोबत चांगला वेळ घालवाल.

**मिथुन :** आज तुमचे महत्त्वाचे काम वेळीच पूर्ण करण्याचा प्रयत्न करा, नाहीतर पश्चातापाची वेळ येईल. सभ्यपणे वागा आणि राग टाळा. उपजीविकेच्या क्षेत्रात, नोकरीसाठी लोकांचा संघर्ष वाढू शकतो.

**कर्क :** आजचा दिवस ठीक राहील, मनात उत्साह राहील. कामाच्या ठिकाणी दबाव वाढू शकतो. त्यामुळे संयम ठेवा. सहकाजयांची मदत मिळेल. विद्यार्थ्यांसाठी चांगला दिवस आहे.

**सिंह :** तुमच्या कुटुंबात काही शुभ कार्यक्रम घडतील. पण जीवनात अनावश्यक मतभेद निर्माण होऊ शकतात. काही महत्त्वाच्या कामात विलंब झाल्यास तुम्ही नाराज व्हाल. राजकीय महत्त्वाकांक्षा पूर्ण होतील.

**कन्या :** आजचा दिवस पूर्वीपेक्षा चांगला राहील. कुटुंबासोबत फिरायला जाऊ शकता. नवीन लोकांसोबत भेटीगाठी होतील. दिवस फारच आनंदात जाईल. नशिबाची साथ मिळेल.

**तुळ :** कामाच्या ठिकाणी, तुमच्या कनिष्ठ आणि वरिष्ठांशी सहमती दर्शवत राहा. विद्यार्थ्यांनी अभ्यासावर लक्ष केंद्रित करावे. तुमचे मन इकडे तिकडे भटकू देऊ नका. महत्त्वाच्या कामाची जबाबदारी मिळू शकते.

**वृश्चिक :** आज, काही महत्त्वाच्या कामात यश मिळाल्याने तुमचे मनोबल वाढेल. कोणतेही पाऊल उचलताना तुमच्या शहाणपणाने आणि विवेकबुद्धीने विचार करून निर्णय घ्या.


**धनु :** आज तुम्हाला नको असलेल्या प्रवासाला जावे लागू शकते. प्रिय व्यक्तीपासून दूर राहिल्यामुळे तुम्ही अस्वस्थ व्हाल. व्यवसायात अनोळखी व्यक्तीवर जास्त विश्वास ठेवू नका.

**मकर :** आजचा दिवस फारच व्यस्त असणार असेल. आज आवश्यक कामे पूर्ण होतील, खर्चावर नियंत्रण ठेवा. व्यावसायिकांना लाभ होईल. विद्यार्थ्यांसाठी चांगला दिवस आहे. वैवाहिक जीवन सुखमय राहील.

**कुंभ :** नोकरीत बदलीची शक्यता आहे. संयमी वर्तन ठेवा. राजकारणाशी संबंधित लोकांना विशेष यश आणि आदर मिळेल. मित्रांसोबत तुमचे वर्तन संयमीत ठेवा आणि रागावर नियंत्रण ठेवा.

**मीन :** वृश्चिक राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस उत्तम राहील. काम वेळेत पूर्ण होईल. वैवाहिक जीवनात गोडवा राहील. विद्यार्थ्यांना यश मिळेल. आरोग्य चांगले राहील.

# शब्दकोडे क्रमांक २१८८



**आडवे शब्द :-**

१) सुरळीत चालू असलेल्या कामास अडथळा निर्माण करणे या अर्थाची म्हण
८) कहाणी
९) मिठी
१०) सोन्याचा धागा
११) छाती
१२) एक तारवाद्य
१३) मणका
१५) बागेतील किंवा रानातील सहल, जेवण इ.
१७) मेदिनी
१९) चुकवणारा
२१) मौल्यवान रत्ने
२३) एकत्र जमलेल्या लोकांचा समूह
२४) सर्वत्र सांगत सुटणे
२६) नमस्कार
२७) करगोटा
२९) गावाचा कारभार पाहणारा
३२) पशू
३४) सक्षम *** रामदासस्वामी
३६) उपस्थित
३७) प्रचंड, मोठा
३८) धनुष्याच्या ताणलेल्या दोरीचा आवाज
३९) मोठा समुद्र
४०) वाळ्याचे सुगंधी मूळ
४२) टिकून राहाणे
४४) कवाड
४५) तरतरी आणणारे एक उष्ण पेय
५०) रंग (इं.)
५१) बेडकांचे ओरडणे
५४) पुरुष
५५) सारखा
५६) एक तारवाद्य
५७) व्यापारी फायदा
५९) एकाद्या कार्यास आयुष्य वाहणे
६३) कप्पा, खण
६४) चांदी
६६) मोठी जाड सुई
६७) व्रत
६९) कच्चा पूल
७१) सदन
७२) आश्चर्य
७३) अथवा
७४) सर्वस्व
७५) धातूचा धागा

**उभे शब्द :-**

१) गडीमाणसे
२) बारीक केस
३) पशुंची गर्भावस्था
४) शरम
५) लापशी
६) एक खाद्य पदार्थ
७) गावजेवण
८) गुणांची चाहा करणारा
१२) खळबळ उडवून देणारी (घटना)
१३) एक सुगंधी वनस्पती
१४) अंजनाचा एक प्रकार
१५) पाट्याचा जोडीदार
१६) लोक, प्रजा
१८) मलई
२०) वेळ, मृत्यू
२२) शेत, जाणे येणे
२५) कडू चव
२८) व्यायाम
२९) श्रीकृष्णाचे एक नाव
३०) लाट
३१) मानवी कत्तल
३२) उग्र, मवाळच्या विरुद्ध
३३) युद्धासाठी उत्सुक असलेला
३४) विषम च्या विरुद्ध
३५) मंदिराचा मुख्य दरवाजा
३७) दौंड जवलचे एक रेल्वे जंक्शनचे गाव
४१) श्रीविष्णूचे दहा अवतार
४३) जाणे
४५) चालणे, चालू नाणे
४७) शुद्ध, पवित्र
४९) जय पराजय
५०) अर्ध वर्तुळाकार
५२) ढीग
५३) वाघ-सिंहाचे ओरडणे
५५) सदोदित
५८) विवाहविच्छेद
६०) कैफ, धुंदी
६१) मजबूत, दणकट
६२) पडणे
६५) वेगवान
६८) प्रामाणिक
७०) अवधान, लक्ष
७१) दाट, दग

(उत्तर उद्याच्या अंकात)

### मागील शब्दकोड्याचे उत्तर

